(न्यायनिर्णय)

| MHAH150017852022 | केस दाखल दिनांक | १६/०२/२०२१ |
|---|---|---|
| | केस नोंदणी दिनांक | १६/०२/२०२१ |
| | केस निकाल दिनांक | २९/११/२०२४ |
| | कालावधी | वर्ष ०३ महिने ०९ दिवस १२ |

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.१, नेवासा यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी - डॉ. पी. आर. सुगांवकर)**

फौ.किरकोळ अर्ज क्र.११३/२०२२ नि.क्र.१५

१. सौ. सविता सचिन गालफाडे
वय-३० वर्षे, धंदा - काही नाही

२. श्रध्दा सचिन गालफाडे
वय- १२ वर्षे, धंदा- शिक्षण

३. सिध्दी सचिन गालफाडे
वय- ११ वर्षे, धंदा- शिक्षण

४. सृष्टी सचिन गालफाडे
वय- १० वर्षे, धंदा- शिक्षण
अर्जदार नं.२ ते ४ ची अपाक. अर्जदार नं.१ जनक आई
सर्व ह.मु.द्वारा मिना कचरु जगधने रा. गंगानगर, नेवासा खुर्द
ता. नेवासा जि. अहमदनगर. ...अर्जदार

**विरुध्द**

१. श्री.सचिन विठ्ठल गालफाडे
वय - ३५ वर्ष, व्यवसाय – नोकरी
रा. लक्ष्मीचाळ, नं–६, अमृतनगर, गोळीबार रोड,
इंदिरानगर, मुंबई ८६ ...सामनेवाले

**वकिलपक्ष –** ---------------------------------------------------------------

अर्जदारातर्फे विधीज्ञ - श्री. के. एस. ढेरे
सामनेवालातर्फे विधीज्ञ - श्री. भूषण महाजन

---------------------------------------------------------------

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक- २८/११/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे अन्न, वस्त्र, पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथनः-

अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार नं. १ व सामनेवाला यांचा विवाह दि. २७/०६/२००७ रोजी मौजे मुंबई येथे धर्म शास्त्र पध्दतीने व जाती रिवाजाप्रमाणे झाला होता. सामनेवालाच्या मागणीनुसार अर्जदार नं. १ च्या वडीलांनी सदरचे लग्न मुंबई येथे केले. सदर लग्नामध्ये अर्जदाराच्या आई वडीलांनी संसारउपयोगी चीज वस्तू व स्त्रीधन म्हणून सामनेवाला यास रक्कम रु. १,००,०००/- (रक्कम रुपये एक लाख मात्र ) व एक तोळा मंगळसुत्र व सामनेवाला यास अर्धा तोळयाची अंगठी असे साक्षीदारा समक्ष दिले. सामनेवाला व अर्जदार नं. १ यांचे नाते पती-पत्नी म्हणून आज रोजी अस्तित्वात आहे. लग्नानंतर सामनेवाला यांनी अर्जदार नं. १ हिला १ वर्ष चांगले नांदविले. दरम्यानच्या काळात अर्जदार क्र. १ हिला सामनेवाला पासून पहिली मुलगी श्रध्दा झाली त्यामुळे सामनेवाला व त्याचे आई वडील हे अर्जदार क्र.१ हिला आम्हाला मुलगा पाहिजे होता तुला मुलगी झाली आहे असे म्हणून तिला त्रास देवू लागले. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिला दुसरी मुलगी नामे सिध्दी व तिसरी मुलगी नामे सृष्टी झाली. अर्जदाराला मुली झाल्यामुळे सामनेवाला यांनी अर्जदार क्र. १ हिला सांगितले की, आम्हाला मुलगा हवा होता तू आमच्या कडे नांदण्यासाठी येवू नको तुला फक्त मुलगी होत आहे. त्यानंतर अर्जदार नं. १ च्या आई वडीलांनी अर्जदारास सामनेवाल्याकडे नांदण्यासाठी सोडविले त्यावेळी सामनेवाला हा अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला वारंवार मारहाण करीत होता. त्या बाबत अर्जदाराने पतंगनगर पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गुन्हा रजि नं. १५८९/२०१३ असा दाखल केला त्यामुळे पोलीसांनी समन्स दिल्यानंतर सामनेवाला यांनी अर्जदारला काही दिवस चांगले नांदविले व

त्यानंतर तिला व तिच्या ३ मुलींना पोसण्यासाठी आईकडून पैसे घेवून ये असे म्हणून तिला त्रास देवू लागले. दरम्यान अर्जदाराच्या आई वडीलांनी नातेवाईकांकडून सन २०१५-२०१६ मध्ये रक्कम रु. २०,०००/- ( रक्कम रु. वीस हजार मात्र ) साक्षीदारा समक्ष दिले आहे तरी देखील सामनेवाला यांनी अर्जदारास त्रास देण्यास सुरुवात केली व तिचे अंगावरील दागदागिने काढून घेवून तिला हाकलून दिले तेव्हापासून अर्जदार ही तिच्या मुलींसह तिच्या आई वडीलांकडे राहत आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांना सांभाळण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी सामनेवाला यांची असून सामनेवाला याने ती जबाबदारी जाणीवपूर्वक नाकारली आहे. अर्जदाराची आई ही लोकांचे धुणी भांडी करुन अर्जदार क्र.१ ते ४ यांची उपजिविका भागवत आहे तसेच अर्जदाराला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे अर्जदारावर उपासमारीची वेळ आली आहे. याउलट, सामनेवाला हा आर.एस.प्रकाश या नामांकित कंपनीमध्ये चप्पल बनविण्याचे कंपनीमध्ये नोकरीस असून त्यास दरमहा रक्कम रु. २५,०००/- ( रक्कम रुपये पंचवीस हजार मात्र ) एवढा पगार आहे तसेच त्याची पालखीगण ता जि बीड येथे बागायत शेत जमीन असून त्या पासून त्याला वर्षाकाठी पाच लाखांचे उत्पन्न मिळते. तसेच त्याचे मुंबई येथे दुमजली घर आहे व पुणे येथे ३ रुम चे घर आहे त्यामुळे अर्जदाराने सामनेवाल्याकडून दरमहा रक्कम रु १५,०००/- (रक्कम रुपये पंधरा हजार मात्र) एवढी पोटगी मिळण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात सामनेवाला हा हजर होवून देखील त्याने त्याचे कोणतेही म्हणणे अभिलेखावर दाखल केलेले नाही त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण सामनेवाला विरुध्द विना म्हणणे चालले आहे.

४. प्रस्तुत प्रकरणातील कथन विचारात घेता खालील वादप्रश्न माझ्या विचाराधीन येतातः-

| | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे सिध्द करते काय की, सामनेवाला याला उत्पन्नाचे साधन असून देखील त्याने अर्जदाराची | होय |

| | | |
|---|---|---|
| | पालनपोषण करण्यास नकार दिला आहे काय ? | |
| २ | अर्जदार हे सिध्द करते काय की, ती स्वतःचे पालनपोषण करण्यास असक्षम आहे काय ? | होय |
| ३ | अर्जदार हे सिध्द करते काय की, ती सामनेवाला कडून पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | होय |
| ४ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

५. वादप्रश्न क्र १ ते ४ हे एकमेकांशी संबंधित असल्यामुळे त्यांचे विवेचन मी एकत्रितरित्या करीत आहे.

६. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये सामनेवाल्याविरुध्द दाखल केला आहे त्यासाठी सर्वप्रथम अर्जदाराने अभिलेखावर हे सिध्द करणे गरजेचे आहे की, सामनेवाला याला उत्पन्नाचे साधन असून देखील त्याने अर्जदाराचे पालनपोषण करण्यास नकार दिला आहे व अर्जदार ही स्वतःचे पालनपोषण करण्यास असक्षम आहे त्या पुष्ठयर्थ अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने तिच्या कथनाच्या पुष्ठयर्थ स्वतःला निशाणी १३ खाली तपासले असून निशाणी १५ खाली तिने तिच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर केले आहे. अर्जदाराच्या शपथपत्रातील कथनावरून व निशाणी १५ वरील शपथपत्रावरून असे दिसून येते की, सामनेवाला हा चपलांचा व्यापार करीत असून त्याला शेती उत्पन्नातून वार्षिक पाच लाख रुपये व चप्पल बनविण्याच्या टेंडर पासून दरमहा रक्कम रु १,००,०००/– (रक्कम रुपये एक लाख

मात्र) एवढे उत्पन्न आहे. याउलट, अर्जदारावर तिच्या तीन मुलींची जबाबदारी असल्याचे दिसून येते. पुढे सामनेवाला हा प्रस्तुत प्रकरणात हजर होवून देखील त्याने अर्जदाराचा उलटतपास नोंदविलेला नाही तसेच त्याने त्याचे कोणतेही कथन अभिलेखावर आणलेले नाही अशा परिस्थितीत अर्जदाराचा संपूर्ण पुरावा हा अभिलेखावर अबाधित राहतो. पुढे सामनेवाला हा आज रोजी शारीरिकदृष्टया असक्षम आहे या अनुषंगाने कोणताही पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसून येत नाही याउलट, त्याने वकील पत्रावर सही केल्याचे दिसून येते. अशा प्रकारे आज रोजी सामनेवाला हा शारीरिकदृष्टया सक्षम आहे असे माझे मत आहे. पुढे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ चा अर्ज निर्णित करत असताना सामनेवाला हा केवळ शारीरिकदृष्टया सक्षम असणे गरजेचे आहे. याउलट, अर्जदार ही स्वतःचे पालनपोषण करण्यास सक्षम आहे हे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच अर्जदारावर आज रोजी तिच्या तीन लहान मुलींची जबाबदारी असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी या निष्कर्षास पोहोचते की, सामनेवाला याला उत्पन्नाचे साधन असून देखील त्याने अर्जदाराचे पालनपोषण करण्यास नकार दिला आहे त्यामुळे अर्जदार ही सामनेवाल्याकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे.

७. एखाद्या प्रकरणात पोटगीची रक्कम विचारात घेत असताना दोन्ही पक्षांचा सरासरी राहणीमानाचा दर्जा, अर्जदाराची गरज, सामनेवाल्याची ऐपत, दैनंदिन महागाई या घटकांचा विचार होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने सामनेवाल्याच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा आणलेला नाही. अशा परिस्थितीत एकंदरित सारासार विचार करता मला

असे वाटते की, अर्जदार क्र १ ही सामनेवाल्याकडून दरमहा रक्कम रुपये १,०००/–(रक्कम रुपये एक हजार मात्र), अर्जदार क्र २, ३ व ४ हे प्रत्येकी रक्कम रु. ५००/– (रक्कम रुपये पाचशे मात्र) दरमहा एवढी पोटगी अर्ज दाखल तारखेपासून सामनेवाला कडून मिळणेस पात्र आहे त्यामुळे मी वादप्रश्न क्र. ४ करीता खालील आदेश पारित करीत आहे–

# आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला याने अर्जदार क्र. १ हिला दरमहा १,०००/–(रक्कम रुपये एक हजार मात्र), अर्जदार क्र. २ हिला दरमहा रु.५००/–(रक्कम रुपये पाचशे मात्र), अर्जदार क्र. ३ हिला दरमहा रु.५००/– (रक्कम रुपये पाचशे मात्र), अर्जदार क्र. ४ हिला दरमहा रु.५००/– (रक्कम रुपये पाचशे मात्र) एवढी पोटगी अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन द्यावी.

३. सामनेवाला याने अर्जदारास प्रस्तुतच्या अर्जाच्या खर्चा पोटी रुपये १०००/–(रक्कम रुपये एक हजार मात्र) निकाला पासुन दोन महिन्याच्या आत द्यावेत.

४. प्रस्तुत निकालाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देण्यात यावी.

**(सदरहू न्यायनिर्णय खुले न्यायालयात घोषित केला.)**

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2024.12.17 16:35:35 +0530

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.

दि.२९.११.२०२४
ठिकाण - नेवासा.